REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2024

# लिंगभेदाधीष्ठीत व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
**इतिहास विभाग प्रमुख, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा.**

जगात आपल्या भारतीय संस्कृतीला एक अतिशय आगळं आणी वेगळं स्थान आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे देशाला लाभलेली थोर संस्कृतीक परंपरा होय. प्राचीन काळापासून आपल्या राष्ट्रात स्त्रीयांना मान, सन्मानाचे स्थान होते. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांना सामावून घेतले जात होते. मातृसत्ताक कुटुंब पध्दती अस्तीत्वात होती. "यत्र नारी पूज्यते तत्र रमते देवता" आपले असे एकमेव राष्ट्र आहे की, ज्या ठिकाणी स्त्रीयांचे पूजन केले जात होते. परंतु उत्तर वैदिक काळापासून स्त्रीयांच्या समाजातील स्थानाला उतरती कळा लागली. उत्तर वैदिक काळात महिलांना दुय्यम लेखले जाऊ लागले नव्हे समाजातील तिच्या अस्तीत्वालाच धोका पोहचू लागला.



**समाजात दुय्यम स्थान :**

मध्ययुगीन काळात सुध्दा स्त्रीयांच्या समाजातील अस्तीत्वाला दुय्यम स्थान दिले गेले. अठराव्या आणी एकोणीसाव्या शतकात तर स्त्रीयांना केवळ भोगवस्तू म्हणून पाहिले जाऊ लागले. अतिशय तुच्छतेची आणी हिनतेची वागणूक समाजात दिली जात होती. परंपरावादाच्या भोव-यात स्त्रीयांना पार गुरफटून टाकलेले होते. चूल आणी मूल एवढ्यापुरतेच तिचे अस्तीत्व राहिलेले होते. पुरुषसत्ताक कुटुंबपध्दतीने स्त्रीयांच्या समाजातील स्थानाला धक्का पोहोचलेला होता. स्त्रीयांना अतिशय कष्ट मेहनत करुन सा-या कुटुंबाचा भार सोसावा लागत होता. समतोल विकासासाठी सर्वांगीण् समानता असणे गरजेचे असते. समाजातील विषमता समाज विकास होण्यास मोठा अडसर ठरते. भारतीय समाजात असलेली जात, धर्म, वर्ग तसेच स्त्री पुरुष विषमता असल्यामुळे समाज विभाजित झालेला होता. मनुवादी विचारधारेच्या लोकांनी स्त्रीयांना अतिशय तुच्छतेने वागविले. सा-या परिवारासाठी सर्वस्व वाहून घेणा-या स्त्रीयांना मात्र कनिष्ठ स्थान होते. तिने केवळ कष्ट करून परिवारातील लोकांची सेवा करावी एवढेच अपेक्षीत होते. तिच्या ईच्छा, अपेक्षा, मनोकामना या गोष्टींना काडीमात्र स्थान नव्हते. तिच्या जन्मापासूनच समाजाताचा तिच्याकडे पाहण्याचा वक्र दृष्टीकोन असायचा. मुलींचा जन्म जणू अपशकुन मानला जात होता. मुलीचा जन्म झाल्यावर जन्माला येणा-या बाळा बरोबरच त्या आईलाही दोषी ठरवले जात आणी तिला अनेक दूषणे जावली जात. मुलीचा जन्म हा समाजाच्या दृष्टीकोनातून निषीध्द मानला जात असे. एवढेच नव्हे तर मुलीचा गर्भअसल्यास अनधीकृतपणे गर्भपात

करून जन्माआधीच त्या मुलीच्या गर्भाचा जीव घेतला जात असे. इतका निघुर्णपणे समाज वगातांना दिसतो. मुलीच्या जन्मापासूनच तिच्या जाचाला प्रारंभ होत असे. अगदी तिच्या खाण्यापिण्यावर, वागण्यावर, बोलण्यावर अतिशय कडक बंधने लादलेली असत. समाजाच्या असल्या प्रकारे वाईट, दृष्ट प्रथा आणी परंपरांच्या जबरदस्तीने स्वीकार तिला करावा लागत होता. तिच्या इच्छेविरुध्द अनेक गोष्टी नाईलाजाने तिच्याकडून करून घेतल्या जात असत. तिचं अस्तीत्व चार भींतींच्या आत असून उंबरठ्याच्या आतलं जीवन तिला कंठावे लागत होते. समाजातील कोणत्याही सार्वजनिक उत्सवात तिला प्रकर्षाने दुय्यम लेखले जात असे. वेळोवेळी स्त्रीयांना तुम्ही पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहात अशी हेतुपुरस्कर जाणीव करून दिली जात असे. एकुणच तिने घराच्या सांधीकोप-यात राहावे, काबाडकष्ट करावे, कुटुंबासाठी विशेषता कुटुंबातील पुरुष वर्गासाठी सार काही सेवा म्हणून करावे. परिवाराची सेवा हे आपले इतिकर्तव्य मानावे, आपल्या इच्छा अपेक्षांना मुरळ घालावी नव्हे तिने कोणत्याच इच्छा अपेक्षा ठेवू नयेत, पदरी येईल ते आनंदी मानावे त्यातच समाधान मानावे, लग्नाआधी वडिलांचा, वडिलधा-यांचा शब्द प्रमाण मानावा. लग्नानंतर पतीचा शब्द प्रमाण मानावा, वृध्दापकाळात मुलांच्या शब्दाप्रमाणे वागावे. एकुणच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात पुरुष वर्गाच्या अधीकारात आणी नियंत्रणात रहावे अशी एकुण समाज व्यवस्थेची रचना झालेली होती. स्त्रीवर्ग सुध्दा हेच प्रमाण मानून पुरुषसत्ताक कुटुंब व्यवस्थेत या सा-या बाबी अगदी आनंदाने स्वीकार करीत होत्या. इतकेच नव्हे तर अगदी प्रामाणीकपणे मनापासून सा-या परिवाराची काळजी घेत होत्या. परंतु पुरुषसत्ताक कुटुंब पध्दतीत मात्र तिचं हे समाजासाठी कुटुंबसाठी वाहून घेणे काडीमोल होते. तिचे हे सारे कर्तव्यच आहे ती काही जगावेगळे करीत नाही म्हणून तिच्या सा-या बाबींकडे केवळ तिचे हे कर्तव्यच असल्याने तिच्या श्रमाला, योगदानाला समाज किंमत देत नव्हता. तिच्या या कर्तव्यात तिच्या जीवाची घालमेल होत असली, दैना होत असली तरी त्यावर मात करून तिने निमूटपणे हे सारे करावे अशी अपेक्षा समाजाची तिच्याकडून होती.

### पुरोगामित्वाच्या दिशेने वाटचाल :

शिक्षणाच्या अधीकारापासून तिला तर चार हात लांब ठेवण्यात आलेले होते. शिक्षण घेणे आणी देणे हा केवळ पुरुषांचा अधीकार आहे अशी धारणा समाजाची होती. जनजागृतीचे, समाज विकासाचे शिक्षण हे महत्वपुर्ण साधन आहे. अंधकाराकडून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाणारा शिक्षण हा राजमार्ग आहे. मात्र हा राजमार्ग मी आणी स्त्रीयांसाठी बंद करण्यात आलेला होता स्त्रीयांनी परंपरागत, रुढी प्रथा-परंपरा एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संक्रमित कराव्यात कुठल्याही बाबींची चिकित्सा न करता समीक्षा न करता त्यांचा स्वीकार करावा. स्त्रीयांच्या अपमानास्पद जीवनाला शिक्षण आणी अर्थाचा अभाव हेच प्रमुख कारण असल्याचे दिसते. मानवाला जीवन जगतांना अनुभवातून जीवनावश्यक असलेले व्यावहारीक शिक्षण मिळत असते. स्त्रीयांना पुरुषप्रधान संस्कृतीने परावलंबी जीवन जगण्यास भाग पाडले. मुलगी, पत्नी आणी माता या तिनही अवस्थेत तिला पुरुषावर अवलंबून राहावे लागे. त्यांच्या या प्राप्त परिस्थीतीस तत्कालीन पुरुषप्रधान मानसिकता आणी त्याच मानसिकेतून तयार झालेले धर्मग्रंथ आणी त्यातून निर्माण झालेल्या रुढी, परंपरा सुध्दा कारणीभूत होत्या. एकुणच स्त्रीयांवर सातत्याने पुरुषप्रधान संस्कृतीने हीच विचारधारा बिंबवलेली होती. परिणामी आपले स्वतंत्र अस्तीत्व असते ही भावनाच ती हरवून बसलेली होती. पुरुषप्रधान संस्कृतीच्या वर्चस्वाखाली ती पूर्णपणे दबलेली होती. तिची या गुलामगिरीतून सुटका करायची असेल अज्ञान आणी अंधकारातून तिला बाहेर काढायचे असेल तर त्यावर एकमेव उपाय म्हणजे शिक्षण होय. ही विचारधारा एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणी प्रामुख्याने शिक्षण प्रणालीचा विकास झाला.

विचारीपणा आणी स्वाभीमान या गुणांपासून इतर सा-या चांगल्या गुणांची उत्पत्ती होत असते. आणी हे गुण प्राप्त होण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण आणी या गुणांची जर तातडीची गरज कुठे असेल तर ते हिंदुस्थानात असे एलफिस्टनचे विचार होते. एलफिस्टनच्या मतानुसार शिक्षणामुळे हिंदुस्थानातील अनेक दृष्ट आणी घातक चालीरिती नष्ट होतील. ही विचारधारा प्रत्यक्षात कृतीत आणण्याचे महत्कार्य महात्मा ज्योतीराव फुले आणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या योगदानातून झाले. 31 जुलै 1851 रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील आण्णा चिपळुणकरांच्या वाड्यात पहिली मुलींसाठीची शाळा सुरु झाली, आणी स्त्रीयांच्या शिक्षणाचा मुहुर्तमेढ झाला. नंतरच्या काळात आणी एकविसाव्या शतकात तर स्त्रीयांनी सर्वांगीण क्षेत्रात आपली गुणवत्ता आणी कर्तृत्व सिध्द केलं. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंवा पुरुषांपेक्षाही काकणभर पुढे राहून त्यांनी आपले अस्तीत्व सिध्द केले.

**संदर्भ :-**

1. डॉ. शहा मु. ब. (संपादक) खानदेशचा सांस्कृतिक इतिहास.
2. रानडे प्रतिभा स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणीसावे शतक.
3. केळकर मीना भारतीय स्त्री संकल्पना आणी प्रती.